**दिनांक – ०४/०६/२०२५**

**निशाणी ४२ वरील आदेशान्वये शपथेवर पुढील उलटतपास आरोपी नं. १ व २ तर्फे विधीज्ञ श्री. पी.जी. शिंदे यांचेमार्फत सुरु**

**९.** आरोपी क्र. १ यांचे माहेर य.पा. वाडी व सासर करगणी आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ चे आई–वडील य.पा. वाडी येथे राहतात. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ च्या आईचे घर माझ्या घराशेजारी आहे व आरोपी क्र. १ च्या वडीलांना शेती आहे व ती जिरायत–बागायत स्वरुपाची आहे. हे मला सांगत येणार नाही की, आरोपी क्र. १ च्या वडीलांना जिरायत व बागायत शेतीमधून चांगले उत्पन्न मिळते किंवा कसे.

**१०.** हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ च्या व्यवसायाचे प्रोप्रायटर ते स्वतः आहेत. हे मला सांगता येणार नाही की, आरोपी क्र. १ च्या व्यवसायाचे सर्व व्यवहार आरोपी क्र. १ स्वतः वैयक्तीक करतात किंवा कसे. मी आरोपी क्र. १ यांचे मुंबई येथील शिवानी साडी सेंटर हे दुकान पाहिले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपी क्र. १ यांच्या दुकानातून पूर्वी पत्नीकरीता साडी खरेदी घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ यांचे मुंबई येथे एस.के. ब्युटी सलुन असे दुकान होते. हे म्हणणे खरे आहे की, शिवानी साडी सेंटर व एस.के. ब्युटी सलुन चे प्रोप्रायटर हे आरोपी क्र. १ स्वतः होते. हे मला माहित नाही की, आरोपी क्र. १ यांना मिसळ कट्याचे मासिक उत्पन्न तीन ते चार लाख रुपये होते किंवा कसे. हे मला माहित नाही की, शिवानी साडी सेंटरपासून आरेपी क्र. १ यांना मासिक उत्पन्न तीन ते चार लाख रुपये होते किंवा कसे. हे मला माहित नाही की, आरोपी क्र. १ यांना एस.के. ब्युटी सलुन पासून मासिक उत्पन्न एक ते दीड लाख रुपये होते किंवा कसे.

**११.** माझी आरोपी क्र. २ सोबत ओळख आरोपी. १ यांच्या लग्नापासून झाली. मी आरोपी क्र. १ व २ च्या लग्नाला गेलो नव्हतो. हे मला माहिती नाही की, आरोपी क्र. २ यांची करगणी येथे बागायत शेतीजमीन आहे किंवा कसे. हे मला माहिती नाही की, आरोपी क्र. २ यांना बागायत शेतजमीनीमधून चांगले उत्पन्न मिळत होते किंवा कसे. हे मला माहिती नाही की, आरोपी

क्र. २ हे फायर ब्रिगेडमध्ये नोकरीस आहेत किंवा कसे. हे मला माहिती नाही की, आरोपी क्र. २ यांना दरमहा एक ते दिड लाख रुपये पगार आहे किंवा कसे. हे मला माहिती नाही की, आरोपी क्र. १ यांची त्यांच्या तीनही व्यवसायातून मिळणारे चांगले उत्पन्न व वडीलांची शेतीमधून मिळणारे उत्पन्न चांगले असल्यामुळे आरोपी क्र. १ यांची आर्थिक परिस्थिती चांगली होती व आजही आहे किंवा कसे. हे मला माहिती नाही की, आरोपी क्र. २ यांची बागायती शेती व दरमहा पगार चांगला असल्यामुळे आरोपी क्र. २ यांची आर्थिक परिस्थिती चांगली होती.

**१२.** हे म्हणणे खरे आहे की, यापूर्वी माझे व आरोपी क्र. १ मध्ये पैसे हातऊसने देणे–घेण्याचे व्यवहार झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ च्या आई–वडीलांसोबत माझे पैसे देणे–घेण्याचे आर्थिक व्यवहार झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, सन २००९ मध्ये मी आरोपी क्र. १ यांच्या खात्यावर आर्थिक देण्याघेण्याच्या व्यवहारापोटी रक्कम ३०,०००/– रुपये जमा केले होते.

**१३.** हे म्हणणे खरे आहे की, मी शेती व्यवसाय करतो असे दाखविणारा कागदोपत्री पुरावा या प्रकरणात दाखल केला नाही. मी लहान असल्यापासून आरोपी क्र. १ व त्यांच्या आई–वडीलांसोबत माझे संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी व्याजाने पैसे काढले होते व ते परत करण्याकरीता म्हणून माझ्या शेतजमिनी विक्री केल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, मी शेतजमीनी विकल्या आहेत. मी अंदाजे दोन वर्षांपूर्वी शेतजमीन विकली होती. मी राजेश नांगरे, राहणार –य.पा. वाडी यांना शेतजमीन विकली होती. मला शेतीमध्ये सुधारणा करायची होती व माझे वडील आजारी होते याकरीता शेतजमीन विक्री केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी कर्जबाजारी झाल्यामुळे राजेश नांगरे यांना शेतजमीन विकली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी राजेश नांगरे यांना विक्री केलेल्या शेतजमीनीच्या विक्रीपत्रामध्ये, '' मला लोकांचे देणे–पाणी झाले असल्यामुळे शेतजमीन विक्री करीत आहे'' हा मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे आहे की,''घर खर्चासाठी शेजमीनी विक्री केली'' असा मजकूर त्या विक्रीपत्रात नमुद केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, ''शेतीमध्ये सुधारणा करायची आहे'' असा मजकूर विक्रीपत्रात नमुद केलेला नाही.

**१४.** हे म्हणणे खरे आहे की, माझा शेतीशिवाय दुसरा कुठलाही उद्योग नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला शेतीमधून दरवर्षी उत्पन्न मिळते व ते मी विक्री करतो असा कोणताही लेखी पुरावा या प्रकरणात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२१ साली मला शेतीमधून रक्कम रुपये २,५०,०००/- निव्वळ नफा झाला होता असे दाखविणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२१ साली मला माझ्या शेतीमधील कोणत्या पिकांमधून रक्कम रुपये २,५०,०००/- मिळाले असा दाखविणारा कागदोपत्री पुरावा या प्रकरणात दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन २०२१ साली माझ्याकडे बँकेमध्ये रक्कम रुपये २,५०,०००/- नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२१ साली माझ्याकडे रक्कम रुपये २,५०,०००/- नव्हते. साक्षीदार सांगतात की, रोख रक्कम होती. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२१ मध्ये आरोपी क्र. १ यांना दरमहा पाच ते सहा लाख रुपये उत्पन्न मिळत असल्यामुळे आरोपी क्र. १ यांनी मला रुपये २,५०,०००/- हातउसने रक्कम मागितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. २ यांना त्यांची नोकरी व शेतीतून चांगले उत्पन्न मिळत असल्यामुळे आरोपी क्र. १ यांनी सन २०२१ मध्ये मला रुपये २,५०,०००/- हातउसने रक्कम मागितले नव्हते.

**१५.** हे म्हणणे खरे आहे की, माझे व आरोपीमध्ये झालेला तथाकथीत व्यवहार कोणत्या ठिकाणी झाला ते ठिकाण नोटीस व निशाणी १ मध्ये नमुद करण्यास मला कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला य.पा. वाडी किंवा मुंबई येथे कधीही २,५०,०००/- रुपये दिले नाहीत म्हणून तसा मजकूर नोटीस, निशाणी १ मध्ये केला नाही. असे घडले नाही की, रक्कम रुपये २,५०,०००/- मी चोरुन (लपवून) आरोपीला दिले. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी १ मधील परिच्छेद क्र. ३ मध्ये आणि माझ्या शपथपत्र निशाणी २४ मधील परिच्छेद क्र. ३ मध्ये नमुद केलेला मजकूर, 'सदर व्यवसायाच्या भागभांडवलासाठी आरोपींना रक्कम २,५०,०००/- ची गरज पडल्याने आरोपी यांनी माझ्याकडे हातउसनी रक्कम २,५०,०००/- दोन महिन्याच्या परत देण्याच्या बोलीवर मागणी केली' हा खटा नमुद केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ यांनी वैयक्तीकरित्या मला रक्कम २,५०,०००/- मागितले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ यांनी वैयक्तीकरित्या मला रक्कम

२,५०,०००/– मागितले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपी क्र. २ यांना रुपये २,५०,०००/– त्यांच्या हातात दिले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी क्र. १ यांना त्यांच्या हातात रोख रक्कम रुपये २,५०,०००/– दिले नाहीत.

**प्रश्न –** दिनांक १०/०८/२०२१ रोजी आरोपी क्र. १ यांना रक्कम २,५०,०००/– दिले असे निशाणी १ व नोटीसमध्ये नमुद करण्यास कोणतीही अडचण नव्हती ?

**उत्तर –** काय लिहायचे तेवढे डोक्यात आले नाही.

**१६.** हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ ला दि. १०/०८/२०२१ रोजी रक्कम २,५०,०००/– दिले नाहीत म्हणून तसा मजकूर नोटीस व निशाणी १ मध्ये लिहला नाही.

**प्रश्न –** दिनांक १५/१२/२०२१ रोजी कोणत्या आरोपीने रोख रक्कम जवळ नाही त्या आरोपीचे नाव निशाणी १ व नोटीसमध्ये नमुद करण्यास कोणतीही अडचण नव्हती ?

**उत्तर –** तेवढे डोक्यात आले नाही.

**प्रश्न –** दिनांक १५/१२/२०२१ रोजी कोणत्या ठिकाणी आरोपीने रोख रक्कम नाही असे म्हणाले ते ठिकाण निशाणी १ व नोटीसमध्ये नमुद करण्यास कोणतीही अडचण नव्हती ?

**उत्तर –** तेवढे डोक्यात आले नाही.

**प्रश्न –** वादग्रस्त धनादेश कोणत्या ठिकाणी दिला ही बाब नोटीस व निशाणी १ मध्ये नमुद केली नाही ?

**उत्तर –** तेवढे डोक्यात आले नाही.

**१७.** हे म्हणणे खरे नाही की, दि. १५/१२/२०२१ रोजी मला वादग्रस्त धनादेश दिला असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादग्रस्त धनादेश निशाणी ३३ माझ्या हस्ताक्षरात लिहलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ व २ यांना लिहता वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींकडून वादग्रस्त धनादेश लिहून घेण्यास मला कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त धनादेश निशाणी ३३ वर आरोपीची सही नाही. हे म्हणणे खरे आहे

की, वादग्रस्त धनादेश कोणत्या ठिकाणी लिहीला याचा उल्लेख नोटीस व निशाणी १ मध्ये नमुद केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त धनादेशावरील तारीख मी माझ्या सोयीने लिहीली आहे. साक्षीदार सांगतात, आरोपी क्र. १ ने लिहीली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त धनादेशावरील नमुद रक्कम २,५०,०००/– आरोपी मला देणे लागत नव्हते व नाहीत.

**१८.** हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ यांना पाठविलेली नोटीस आरोपीला मिळालेली नाही. साक्षीदार सांगतात, मी स्वतःहून दिलेली आहे. हे मला सांगता येणार नाही की, निशाणी ३५ ची नोटीस मी साक्षीदारांना स्वतः हून दिली होती किंवा नाही. साक्षीदार सांगतात की, मी कोर्टाच्या सही शिक्क्याचे पाकीट पोलीस स्टेशनला जावून दिले होते. हे मला आता आठवत नाही की, मी खारघर पोलीसांकडून पोच घेतली होती किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, मी खारघर पोस्टमनशी संगणमत करुन निशाणी ३६ व ३७ वर शेरा लिहीलेला आहे. मी दिलेल्या नोटीस आरोपी क्र. १ यांना समक्ष पोहोचल्या होत्या. आरोपी क्र. २ च्या नोटीसचे काय झाले हे मला आता सांगता येणार नाही. हे मला सांगता येणार नाही की, आरोपी क्र. १ व २ यांना नोटीस मिळाली नसल्यामुळे त्यांना उत्तर देता आले नाही किंवा कसे.

**१९.** हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला नोटीस पाठविण्याअगोदर मी, माझे वडील आणि आरोपी क्र. १ व त्यांचे आई वडील यांच्यामध्ये जागेच्या हद्दीवरुन वाद झाले होते. आरोपी क्र. १ यांनी रुपये २,५०,०००/– स्विकारले असा मजकूर नोटीस व निशाणी १ मध्ये नमुद केलेला नसावा.

**आरोपी क्र. १ व २ यांच्या वकीलाच्या काही कागदपत्रांआधारे प्रश्न विचारण्याचे आहेत व ती कागदपत्रे आज उपलब्ध झाली नाहीत त्यामुळे उर्वरीत उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्याची तोंडी विनंती केली असता विनंती मान्य करण्यात आली आणि उर्वरीत उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात आला.**

समक्ष

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.06.04 14:56:45 +0530

दि.०४/०६/२०२५ **( आर. बी. कुलकर्णी )**
आटपाडी. सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग आटपाडी